# प्रेस नोट

नाशिक
दिनांक ३/११/२०१८

**आलोसे १) रविद्र चुडामण बाऱ्हे, सहा.अधीक्षक, २) सुदाम लक्ष्मण पाटील, कक्ष सेवक, नेमणुक जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालय, नाशिक, ता.जि.नाशिक यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये शिक्षा झाले बाबत.**

---

तक्रारदार यांचे वैद्यकिय उपचारांचे खर्चाची रक्कम २,८८,०००/—रुपयाचे बिल मंजुरीसाठी वैद्यकिय पडताळणी प्रमाणपत्र तयार करुन जिल्हा शल्य चिकित्सक नाशिक यांचेकडे सही साठी पाठविणेकरीता आलोसे १) रविद्र चुडामण बाऱ्हे, सहा.अधीक्षक, २) सुदाम लक्ष्मण पाटील, कक्ष सेवक, नेमणुक जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालय, नाशिक, यांनी तक्रादार यांचेकडे २१,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाप्रवि.नाशिक कार्यालयात तक्रार दिल्याने तक्रारदार यांचे तक्रारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला. सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी दि.२५/२/२०१० रोजी तक्रारदार यांचेकडून २१,०००/—रुपये लाचेची मागणी करुन जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालय, नाशिक येथे ती स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडून त्यांचे विरुध्द सरकारवाडा पोलीस ठाणे नाशिक शहर येथे गु.र.नं.३०१४/२०१० भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१२,१३(१) (ड),सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आलोसे १) रविद्र चुडामण बाऱ्हे, सहा.अधीक्षक, २) सुदाम लक्ष्मण पाटील, कक्ष सेवक, नेमणुक जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालय, नाशिक यांचेविरुध्द मा.नाशिक न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

सदर खटल्याचा दिनांक ३/११/२०१८ रोजी मा. श्रीमती एस.एस. नायर सो.विशेष जिल्हा व सत्र न्यायाधिश, नाशिक यांनी निकाल दिला असून त्यात आलोसे १) रविद्र चुडामण बाऱ्हे, सहा.अधीक्षक, २) सुदाम लक्ष्मण पाटील, कक्ष सेवक, नेमणुक जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालय, नाशिक यांना दोषी ठरवुन भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आलोसे नं. १ व आलोसे नं. २ यांस कलम ७ प्रमाणे ५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा व १०,०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास १ वर्षे साधी कैद तसेच कलम १३ प्रमाणे ५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा व १०,०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास १ वर्षे साधी कैद. अशी शिक्षा ठोठावलेली आहे तसेच आलोसे नं. ३) डॉ.आसाराम दादासाहेब भालसिंग यांस निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. सदर खटल्याचे कामकाज सरकारपक्षातर्फे श्रीमती पी.पी.जाधव मॅडम, अति. सरकारी अभियोक्ता, नाशिक यांनी पाहिले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅंडलाईन व मोबाईल ते लॅंडलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक